# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १४-०१-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक १४ जानेवारी २०१५ (दिं.१३-०१-१५ ची तहकूब सभा-का.प.क्र .३५) रोजी मा.महापौर सौ. कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सभा मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२-२५ वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली.सभेला अति.आयुक्त श्री.रमेश पवार ,नगरसचिव श्री. एम.ए पठाण तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
२. स.स. श्री. विजय लक्ष्मण वाघचौरे
३. स.स. श्री. किशोर बाबुराव नागरे
४. स.स.श्री. रावसाहेब धोंडीराम गायकवाड
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
७. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
८. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
९. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१०. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
११. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१२. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१३. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१४. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१५. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
१६. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
१७. स.स.श्री.शिंदे राजू रामराव
१८. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
१९. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२०. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
२१. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
२२. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
२३. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र

२४. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
२५. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
२६. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
२७. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
२८. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
२९. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
३०. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
३१. स.स.श्री.खान आगा मिया खान
३२. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
३३. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
३४. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
३५. स.स.श्री. वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंते
३६. स.स.श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
३७. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे
३८. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
३९. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
४०. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
४१. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
४२. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
४३. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
४४. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
४५. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
४६. स.स.श्री. सुशिल तुकाराम खेडकर
४७. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
४८. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
४९. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
५०. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
५१. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
५२. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन

<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नांवे</u>

स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
श्रीमती पाटील रेखा दिनकरराव
स.सदस्यांची उपस्थिती रजिस्टर प्रमाणे नोंद घेणे.

श्री.प्रफुल्ल मालाणी :काल सभेत जे मुद्दे मांडले त्याचा शहर अभियंता यांचा जेथे खुलासा थांबला त्यांच्या कडून पुढील खुलासा घेण्यात यावा.

श्री.प्रमोद राठोड :दररोज पाणी देणार आहे का? रू ३०५० पाणीपट्टी ठेवणार असेल तर दररोज पाणी द्यावे. दोन दिवसा आड पाणी येणार असेल तर १८०० रू आकारावे.

श्रीमती साधना सुरडकर :माजी महापौर सौ.रहाटकर मॅडम असतांना करारनामा केला त्या करारनाम्यात बदल केला असे पेपरला आले नेमका काय बदल केला माहिती द्यावी.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :समांतर एजन्सीचे डायरेक्टर कोण? या कंपनीच्या अंतर्गत किती एजन्सीच काम करणार आहे त्याचे डायरेक्टर कोण आहे.कंपनीचे डायरेक्टर हे राजकीय दृष्टया सक्षम असल्यामूळे अधिकारी या योजनेला खतपाणी घालत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :करारनाम्यात काय बदल केला.वार्षिक पाणीपट्टी रूपये ३०५० प्रमाणे वसुल करणार असेल तर दररोज पाणी देणार आहेत का ?

मा.उपमहापौर :काल ज्या मुद्यावर चर्चा चालू होती तेथून आज सुरूवात करावी.

श्री.त्रिंबक तुपे :करारनाम्यात बदल केला असेल तर गंभीर बाब आहे खुलासा घ्यावा.पाणीपट्टी रूपये ३०५० घेणार आहेत का? दररोज पाणी पुरवू शकतो का ?

श्री.मीर हिदायत अली : करारनाम्यात बदल केल्याच्या पेपरला बातम्या आहेत.सत्य काय आहे माहिती घ्यावी.

श्री.प्रशांत देसरडा :करारनामा मराठी भाषेतून देणे आवश्यक आहे. मराठी भाषांतर करण्यासाठी पाऊल उचलले होते. संबधीत विभागाकडे पैसे भरणा केले का ?

मा.उपमहापौर :करारनाम्यात बदल केला असेल तर गंभीर बाब आहे.माहिती घ्यावी.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी : पाणी वाढवून मिळेल तेंव्हा दरवाढ करणार असे ठरले होते.

श्री.मीर हिदायत अली : पहिल्यांदा एवढी मोठी योजना होत आहे.सन २००९ ला माजी महापौर सौ.विजयाताई रहाटकर यांनी यास मंजूरी दिली. सन २०११ मध्ये करारनामा केला जेंव्हा प्रस्ताव सभेसमोर आला तेंव्हा करारनाम्याचे मराठीतून भाषातंर करण्यासाठी ४८५० भरून परवानगी घ्यावी लागेल असे म्हटले होते संबधीत कार्यालयास पत्र देवून मराठीतून करारनामा भाषांतर करण्याबाबत कार्यवाही करावी.

श्रीमती साधना सुरडकर :काल जे प्रेझेन्टेशन दाखविले त्याची प्रत सदस्यांना द्यावी.

श्री.जगदीश सिध्द :१ ते ३८ मुद्दे मराठीतून करारनाम्यात दिले समजून सागांवे ९०टक्के करारनामा सदस्यांना समजलेला नाही. मराठीतून भाषांतर करावे.

शहर अभियंता :माजी महापौर सौ.विजया रहाटकर यांचे कार्यकाळात कन्सेशन ॲग्रीमेंन्ट मंजूरीसाठी ठेवले होते. कन्सेशन ॲग्रीमेंन्ट हा एक टेंडरचा पार्ट होता. यातील बारीक सारीक गोष्टी किरकोळ बदल झाले असतील या संदर्भात ३ प्री-बिड बैठका झाल्या, मुख्यत: फायनॅनशीयल मध्ये तसेच महापालिकेला आर्थीक बाधा पोहचेल असे बदल केलेले नाही. टेक्नीकल दृष्टया कागदपत्रामध्ये किरकोळ चेजेंस केले. त्याच्या प्रती दिल्या जातील. केंद्र शासन व डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिक, नवी दिल्ली, तसेच राज्य शासनाचा पीपीपी सेल या सर्व गोष्टी मराठीतून करणे अवघड झाले असते. मराठीमध्ये करारनामा तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली.८-१० दिवसात काम करून घेतले जाईल.एसपीएमएल ॲण्ड कन्सलटंट वे-बॅक, एम.डब्ल्यु.एस.व इतर दोन कंपनीला मंजुरी दिली. विशीष्ट हेतूने कंपनी स्थापन करण्याची मुभा दिली.

श्री.प्रमोद राठोड :टेंडर झाले तेंव्हा KIPL नावाची एजन्सी होती त्यांचे टेंडर रिजेक्ट केले. ती कंपनी पुन्हा यामध्ये सामील कशी होऊ शकते.

शहर अभियंता :कन्सेशन ॲग्रीमेंट मध्ये अशी तरतूद आहे की, फायनंससाठी एक एजन्सी कुठल्याही कंपनीला घेवू शकते.

श्री.प्रमोद राठोड :दुस-या क्रमांकावर एक एजन्सी होती टेंडर रिजेक्ट केले त्याच कंपनीचा पुन्हा या प्रोजक्ट मधे सहभाग आहे.तर त्यांचे टेंडर रिजेक्ट करून उपयोग काय?

शहर अभियंता :फायनन्स उभे करण्यासाठी कुणाचीही एजन्सी मदत घेवू शकते.

श्री.प्रमोद राठोड :रिजेक्ट केलेली कंपनी टेंडर घेतलेल्या कंपनीला जॉईन्ट होते योग्य आहे का?

श्री.हुशारसिंग चव्हाण :कंपनीचे डायरेक्टर कोण आहे नोंदणी कुठे झाली तेही सांगावे.

श्री.नासेर खान :करारनामा बदल होऊ शकत नाही असे सांगण्यात येते. करारनाम्यात काय करता येते? काय करता येत नाही? ते सांगावे मुळ मुद्दापासून बाजूला जात आहोत.

श्री.बाळासाहेब मुंडे :कोण मालक घेणे देणे नाही. बाकीचे सांगा पाणीपट्टी कमी करावे.

शहर अभियंता :कंपनीचे डायरेक्टर श्री.सुशिल शेट्टी, वृषभ शेट्टी, प्रल्हाद मुंदडा, अशोक अग्रवाल, पृथ्वीराज काकडे, संजय काकटे व अशोक यादव असे सात संचालक आहेत.

श्री.राजू शिंदे :KIPL रिजेक्ट केली ते यात कसे समावेश होतात. डायरेक्टर कसे बदलतात.

शहर अभियंता :फायनंस पार्टनर घेऊ शकतात.

श्री.राजू शिंदे :कोणासही घेता येते. इतिवृत्तांत यावे.मी मा.न्यायालयात दाद मागणार आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :करारनाम्यात ज्या जाचक अटी आहे त्या रद्द करता येतात का, डीआय पाईप टाकणार का? ५.२५ कोटी दरमहा देतो ते देण्याचे बंद होणार का, पाणीपट्टी १८०० रू की वाढणार आहे सन २०१० मध्ये जे ४० कोटींचा उल्लेख आहे. सुजल निर्मल योंजनेची रक्कम खर्च झाले ती कंपनीकडून वसुल करणार की नाही. धार्मिक स्थळांना टँकर पुरवठा मोफत देणार किंवा कसे? यावर चर्चा व्हावी.

श्री.त्रिंबक तुपे :कालच्या मुद्यावर चर्चा व्हावी.

श्री.सुरेंद्र कुलकणी :कंपनीने दररोज पाणी द्यावे तोपर्यत एकही पैसा कंपनीला देवू नये.

श्री.समीर राजूरकर :ऑडीटर नेमण्याबाबत, डीआय पाईप बाबत तसेच कलेक्शन अकाऊटं कुणाकडे असणार,पाणी मिळाले नाही तर टँकर देणार का ?या सर्व बाबीचा खुलासा व्हावा.

मा.उपमहापौर :नवीन नळ कनेक्शनसाठी महापालिका रू.३३००-३४०० रू घेत असे आता कंपनी एकूण १० ते १५ हजार चार्जेस आकारत आहे.

श्री.जगदीश सिंध्द :कन्सेशन ॲग्रीमेंन्ट फायनल नाही.ब्लॅक लिस्ट कंपनीला काम दिले गेले. कोणी हा करारनामा केला आहे

शहर अभियंता :करारनामा महासभेने केलेला आहे.

या वेळी सभागृहात मोठमोठयाने स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.किशोर नागरे :काल जे प्रश्न उपस्थित केले होते त्यांचा खुलासा करावा.

मा.महापौर :मुळ मुद्यावर शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता :एकूण ७९२ कोटीची योजना आहे मुळ योजना ३५९.६७ कोटीची होती त्यात डीआय पाईपसाठी डिस्ट्रीब्युशनची तरतूद आहे. २००० मी. एम.एस. पाईप लाईन असेल. शहरामध्ये ३०० मी.मी व्यासापर्यंत च्या लाईन डीआय असेल ७००मी.मी.,८००मी.मी.,९०० मी.मी.एम.एस.पाईप लाईन हे मुळ प्रोजेक्ट मध्ये आहे. परंतु हा प्रोजेक्ट पीपीपी मध्ये वर्ग केला त्यावेळी डीआय तसेच एचडीपी पाईपचा विचार केला जेंव्हा प्रीबीड बैठक झाली. त्यावेळी ११ कंपनीचे कन्स्लटंट उपस्थित होते.मोस्ट ऑफ दी कंपनीचे सर्व्हीस लेबल पॅरेमीटर असे म्हणणे होते की, डीआय ऐवजी एचडीपी असे कॉंबीनेशन असावे. तसे ठेवण्याचे अधिकार केंद्र शासनाला आहे. जर एचडीपी पाईप वापरले तर १५३ कोटीची बचत होणार. ती रक्कम संबधीत एजन्सीला दिली जाणार नाही ती महापालिकेला ग्रॅण्ड मध्ये वापरता येईल. सध्या UIDSSMT या योजनेला केंद्र शासनाने बंदी केली. दुसरा हप्ता मिळेल की नाही यावर शंका वाटते. त्यामूळे १५३ कोटी सेव्हींग होणारी रक्कम महापालिकेची असेल कंपनीला दिली जाणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :डीआय पाईप वापरले तर पुढील ३० वर्षासाठी योजनेचे डिझाईन केले असे सांगितले.एचडीपी पाईप वापरले तर तुटफुट होणार त्यावर पुन्हा खर्च करावा लागणार त्यासाठी जेथे शक्य असेल तेथे डीआय पाईपच वापरावे.

| | |
|---|---|
| शहर अभियता | :एच.डी.पी. व डी.आय. यांचे कॉंबीनेशन असलेले योग्य राहील. |
| श्री.समीर राजूरकर | :जेथे जेथे पाण्याचे डिस्ट्रीब्यूशनचे काम चालू आहे तेथे एचडीपी पाईप वापरत आहेत. जे १५३ कोटी एचडीपी पाईप टाकण्याने सेव्हींग होणार कोणत्या ग्रॅण्ड मधून सेव्हींग शिप्ट करणार मूळ योजनेमध्ये हे समाविष्ट झाले पाहिजे. नसता पुढे ठेकेदार आरबीट्रेटर नेमण्याची मागणी करेल. ७५ कोटी त्याला ७५ कोटी मनपास असे होऊ नये. १५३ कोटी मुळ योजनेत सामील करावे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :डीआय पाईप टाकण्यासाठी केंद्र शासनाची परवानगीसाठी मागणी करावी. |
| शहर अभियंता | :सेन्ट्रल गव्हरमेंन्टमध्ये मोठे तज्ञ मंडळी आहेत.लाईटचा प्रश्न असेल जवळपास डीआय व एचडीपी पाईपचे आयुष्य जवळपास सारखेच उलट एचडीपी पाईप वरून अनधिकृत कनेक्शन घेता येत नाही. तसेच सी व्हॅल्यू म्हणजे पाणी वहन क्षमता जास्त आहे. मुळ प्रस्तव डीआय पाईपचा आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :२० वर्ष ही कंपनी काम करणार कंपनी अधिकृत अनधिकृत चा शोध घेईल.कंपनीची योजना सक्षम आहे म्हणून काम दिले. डीआय पाईप वापरावे. त्याचे आयुष्य जास्त असते. इंजिनिअरींग संस्थेचा अहवाल घेवून योग्य निर्णय घ्यावा. डीआय पाईपचा आग्रह करावा. |
| मा.उपमहापौर | :या योजनेसाठी डीआय पाईपच वापरावे. |
| श्री.त्रिंबक तुपे | :डीआय पाईपच टाकावे.सभागृहाची भावना आहे. |
| श्री.सुशिल खेडकर | :डीआय पाईपच्या हिशोबाने अंदाजपत्रक तयार केले असेल आता एचडीपी पाईप टाकले तर नवीन अंदाजपत्रक तयार करणार काय? |
| मा.महापौर | :सभागृहाच्या भावना लक्षात आल्या डीआय पाईपच वापरावे यात बदल होऊ नये. |
| शहर अभियंता | :मी माझी बाजु मांडली. सभागृहाने महापौरांने रुलींग दिलेले आहे. |
| श्री.प्रफुल्ल मालाणी | :एचडीपी पाईप वापरण्या संदर्भात केंद्र शासनाकडे पत्र व्यवहार केला का? ही कल्पना मध्येच कशी आली. |
| श्री.राजू शिंदे | :डीआय पाईप वापरावे लागेल. |
| शहर अभियंता | :पाणीपट्टीची वसुली व थकबाकी रक्कम ही महापालिकेच्या कलेक्शन खात्यात जमा होते. आतापर्यंत ७.३७ कोटी पाणीपट्टीतून वसुल झाले. |
| श्री.समीर राजूरकर | :एस्को अकाऊंटचे काम कोण पाहणार आहे? |
| शहर अभियंता | :महानगरपालिका एस्को अंकाऊट चालविणार आहे |
| श्री.समीर राजूरकर | :हे अकाऊंट शहर अभियंता,मुख्यलेखाधिकारी मिळून की फक्त मुख्यलेखाधिकारी चालविणार आहे.यापूर्वी एएमटी कंपनीचे एस्को अंकाऊट मुख्यलेखाधिकारी यांचेकडे होते. परस्पर त्यांचे अधिकार काढून एजन्सीने धनादेश विड्रॉल केले गेले. मुख्यलेखाधिकारी यांना माहित होत नसे.असा प्रकार या योजनेच्या कामात होऊ नये. |

| | |
|---|---|
| शहर अभियंता | :एस्को अकाऊंटमधून कुठल्याही एका पार्टीला पैसे काढता येत नाही मनपाच्या मर्जीशिवाय पैसे काढू शकत नाही. |
| श्री.समीर राजूरकर | :एस्को अंकाऊटचे मुख्यलेखाधिकारी यांना दिलेले अधिकार काढायचे असेल तर आयुक्तांनी सर्वसाधारण सभेची परवानगी घ्यावी. |
| शहर अभियंता | :कंपनीला त्याचे हिस्स्याची रक्कम द्यायची असेल तर शहर अभियंता शिफारस करेल व त्यानुसार मुख्यलेखाधिकारी ती रक्कम कंपनीच्या खात्यावर जमा करेल अशी प्रोसेस आहे. |
| श्री.समीर राजूरकर | :एस्को अकाऊंटमध्ये ज्यांची नावे आहे ते विड्रॉल करण्यासाठी सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी. |
| मा.महापौर | :एस्को अंकाऊट साठी ज्यांना अधिकार दिले त्यांची नावे वगळायची असेल तर सर्वसाधारण सभेची प्रशासनाने मान्यता घ्यावी. |
| श्री.काशीनाथ कोकाटे | :मागील प्रश्नाचा खुलासा झालेला नाही. |
| शहर अभियंता | :स्टंड पोस्ट मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने बंद केले आहे. गरीबांसाठी ग्रुप मध्ये कनेक्शन देण्यात येईल. सर्वसामान्यासाठी सार्वजनिक नळ देण्याची नियोजन आहे उदा. १० गरीब लोकांचा गट असेल त्यांचेसाठी एक नळ कनेक्शन. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :सामान्य व्यक्ती म्हणजे कोण आम्ही सामान्य आहोत.मोफत पाणी कोठेही मिळत नाही. |
| श्री.त्रिंबक तुपे | :१० जणांचे ग्रुप हा अपार्टमेंट मध्ये असु शकतो. |
| शहर अभियंता | :जे गरीब आहेत. पाणीपट्टी भरू शकत नाही. अशाची अगोदर छाननी करणार,पाहणी करणार त्यानंतर नळ कनेक्शन देणार. |
| श्री.अशोक बेहडे | :एका चहा टपरीसाठी स्टॅण्ड पोस्ट नळ कनेक्शन दिले जाते. |
| शहर अभियता | :अनधिकृत घेतले असेल तर कार्यवाही केली जाईल.सुजल निर्मल योजनेतून राज्य शासनाने ३७ कोटी दिले होते. ७५ टक्के राज्य शासन व २५ टक्के महापालिका असा पॅटर्न होता. नक्षत्रवाडी ते रेल्वेस्टेशन पर्यत ४० कोटीची लाईन टाकली ही रक्कम ७९२ कोटीच्या मध्ये ग्राहय नाही असे असते तर ही योजना ८३२ कोटीची झाली असती. |
| श्री.प्रशांत देसरडा | :कंपनी या लाईनचा उपयोग करणार आहेत का ? |
| शहर अभियंता | :कंपनी या लाईनचा उपयोग करणार आहे कंपनीला साधनसामुग्री दिली.५९ जलकुंभ बांधलेले दिले. |
| श्री.प्रशांत देसरडा | :जेंव्हा टेंडर काढले तेंव्हा ४० कोटीचे कमी होते हे अपेक्षीत होते का? |
| शहर अभिंयंता | :कन्सेशन डाकुमेंटमध्ये सर्व माहिती दिली आहे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :४० कोटीचे काम दोन वर्षापुर्वीच झाले.७९२ कोटीत तो खर्च असेल तर तो वसुल करू असा करारनाम्यात उल्लेख करावा.डीआय पाईप टाकण्यात यावे. समांतर एजन्सीकडून नागरीकांना होत असलेला त्रास कमी करावा. |

शहर अभियंता :यात सर्व भागातील एकूण १२८९ कि.मी. जलवाहिनी टाकणार आहेत ४० कोटीचे कामासह जे आकस्मीत पाणीपुरवठा योजनेसाठी १२ कोटी खर्च केले त्या सह कंपनीला ट्रान्सफर करावे लागणार करारनाम्यात सर्व उल्लेख आहे.

श्री.प्रशांत देसरडा :या करारनाम्याची मा.उच्च न्यायालयाचे न्यायधीश यांचेकडून चौकशी व्हावी.टेंडर काढतांना महापालिकेने केलेले १२ कोटीचे ॲप्रोच चॅनल,सुजल निर्मल योजनेतून ४० कोटीचे केलेले काम त्या एजन्सीला देणार होतो हे अपेक्षीत धरायला नको होते.

शहर अभियंता :कन्सेशन ॲग्रीमेंन्टमध्ये ही दोन्ही कामे केलेले कंपनीकडे ट्रान्सफर केले जातील.पुर्ण शहरात नवीन ले-आऊटमध्ये १२८९ की. मी.लाईन टाकणारच आहे.

श्री.प्रशांत देसरडा :एकूण ४० व १२ कोटी महापालिकेने खर्च केले कंपनीला महापालिकेच्या हिस्यापोटी जी रक्कम द्यावी लागणार आहे त्यातून ही रक्कम वजा करुन घ्यावी. दोन दिवस सभा होते एक ही हिताचा निर्णय होत नाही.

शहर अभियंता :कन्सेशन ॲग्रीमेंन्टनुसार तसे करता येणार नाही.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.सुशिल खेडकर :करारनाम्यात बदल करता येणार नाही आताच शहर अभियंता यांनी म्हटले कालच्या बैठकीत मा.महापौर यांनी जो निर्णय दिला त्याची अमलबजावणी होणार आहे का?

मा.उपमहापौर :करारनाम्यात बदल करायचा असेल तर संबधीत ठेकेदार, महापालिकेची मान्यता घेऊन ज्या जाचक अटी वाटत असेल त्या कमी करण्याचा एक ड्रॉफ्ट तयार करून सर्वसाधारण सभेची मंजूरी घेवून ही कार्यवाही करता येईल.

श्री.प्रशांत देसरडा :जे हस्तांतर करावयाचे आहे ते यादीमध्ये नाही.

यावेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

शहर अभियंता :टेंडर काढले तेंव्हा ४० कोटीचे व १२ कोटीचे केलेले काम ग्रहीत धरुनच काढले आहे.हा खर्च अगोदर केलेला आहे.

श्री.सुशिल खेडकर :पाणीपट्टी वसुली महापालिकेने करावी असे मा.महापौर यांनी आदेशीत केले त्याची अमलबजावणी होणार की नाही.

शहर अभिंयता :पाणीपट्टी वसुली व पाणीपुरवठा वितरण महापालिकेने करण्यासाठी एजन्सी व महापालिकेच्या मान्यतेने करावे लागेल.

श्री.रेणुकादास वैद्य :यात जाचक अटी आहे सर्वसामान्यांना त्याचा त्रास होतो त्या वगळाव्या यासाठी स.पदाधिकारी जेष्ठ सदस्य मा.आयुक्त , अधिकारी यांची कमेटी करावी चर्चा करून योग्य निर्णय घ्यावा.

मा.महापौर :यासाठी ५ स.पदाधिकारी तसेच ०५ स.सदस्य असे १० सदस्यीय समिती नेमण्यात येईल योग्य निर्णय घेवू.

श्री.सुरेंद्र कुलकणी :सर्व पक्षीय समिती असावी.

श्री.किशोर नागरे :पक्षाचे गटनेते तसेच स.पदाधिकारी व काही सदस्य यांची एक कमेटी करावी. कमेटीचा अहवाल सर्वसाधारण सभेपुढे आणावा व योग्य निर्णय यावर घेण्यात यावा.

मा.महापौर :कमेटी स्थापन करून सभागृहासमोर अहवाल ठेवू.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी डायस समोर येऊन बोलत असतात.

मा.महापौर :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.किशोर नागरे :गुंठेवारी भागात पाणी येत नाही.या भागात विकास कामे होणार आहे का?

श्री.जगदीश सिध्द :टेंडर प्रोसेस झाली त्यावेळी कोणी टेंडर भरलेले होते व किती लोकांचे टेंडर ओपण करण्यात आले व टेंडर उघडण्याची तारीख कोणती होती.

शहर अभियंता :स्थायी समिती समोर पुर्ण माहिती सादर केलेली होती.

मा.महापौर :१० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते.(वेळ दु.१.४० वा.पुन्हा दु.२.३० वा सभेला सुरूवात.)

श्री.त्रिंबक तुपे :गुंठेवारी भागात पाणी पुरवठयाची कामे होणार की नाही खुलासा करावा.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :संमातर एजन्सी गुंठेवारी भागात कामे करणार आहेत काय ?

शहर अभियंता :एकूण १२८० कि.मी. लाईन शहरात टाकणार त्यात गुंठेवारी भागातही कामे होणार आहे शहरातील असी लाईन बदलणार आहोत. २-५ वर्षात अनेक ठिकाणी डीआय पाईप टाकल्या त्या बदलणार नाही.ए.सी.लाईन आहे तेच बदलणार.

श्री.बाळासाहेब मुंडे :किती दिवसात काम होणार आहे.

शहर अभियंता :तीन वर्षाचा कालावधी कंपनीला दिलेला आहे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :अनेक भागात लाईन टाकण्यास मंजुरी झालेली आहे परंतु ती कामे थांबलेली आहे केंव्हा सुरू करणार आहे.

शहर अभियंता :कनेक्शन ॲग्रीमेंन्ट झाल्यानंतर ब-याच कामाचे अंदाजपत्रक मंजूर झाले होते ती कामे थांबविली होती आता संबधीत एजन्सीकडून ते काम करून घेण्यासाठी कार्यवाही होईल.

श्री.संजय चौधरी :अनेक भागातील पाणीपुरवठा व ड्रेनेजच्या कामाचे टेंडर झाले. कामाची आवश्यकता होती तरी काम केले नाही माझ्या वार्डात ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाण्यामध्ये मिसळत आहे.अधिकारी यांना फोन केला असता कंपनी काम करणार असे उत्तर मिळते.

शहर अभियंता :अशी कामे प्राधान्याने हाती घेतली जातील.

श्री.त्रिंबक तुपे :ज्या भागातून गुंठेवारी भरणा केला नाही अशाही ठिकाणी नवीन पाईप टाकणार आहेत का?

शहर अभियंता :गुंठेवारीतून पैसे भरणा करून घेणार त्यानंतर तेथे काम करण्यात येतील.

श्री.बाळासाहेब मुंडे :अनेक सर्वे नंबर गुंठेवारी नियमीत झाले तेथे काम सुरू करावे.

श्रीत्रिंबक तुपे :नवीन पाईप लाईन टाकल्यानंतर अनधिकृत नळ, नवीन कनेक्शन देणेसाठी अडचणी येणार आहे.प्रशासनाचे एजन्सीवर कन्ट्रोल नाही. एजन्सी कडुन पाहिजे तसा रिस्पॉन्स मिळत नाही.पाणीपुरवठा एजन्सीकडे गेल्यानंतर मनपाचे अधिकारी फोन घेत नाही याचा अर्थ महापालिकेची जबाबदारी संपली असे समजायचे का ?किती कर्मचारी व टँकर एजन्सीला दिले. पुर्वी नवीन कनेक्शन, टँकर देण्यासाठी मनपाचे कर्मचारी जागेवर असत परंतु तीन महिण्यापासून कंपनीकडून पाणी घ्यायचे झाल्यास वार्ड अधिकारी यांचेकडे जाऊन पावती घ्यावी लागते त्यावर ही टँकर मिळण्याची गॅरन्टी नाही.नवीन कनेक्शनसाठी पुर्वी ३४००ते ३६०० रू खर्च येत असे आता कंपनी ३५००-३६००रू डिपॉजीट घेवून १० ते १२ हजार चार्जेस लावत आहे याचा नागरीकांवर बोजा टाकण्यात येतो असे बरोबर नाही.कमेटी नियुक्त केल्यास याचा विचार कमेटीने करावा. करारनाम्यात दुरूस्ती करावी. मीटर कंपनी बसवून देणार का चार्ज किती लावणार, मार्केट मधे जर ८००-१०००रू मीटरसाठी लागणार असेल व कंपनी ४ ते ५ हजार चार्जेस आकारत असेल तर योग्य नाही नागरीकांना सुट दिली पाहिजे.पाणी येण्यास खंड पडल्यानंतर टँकर मागितले तर दिले जात नाही. ७-८ दिवसानंतर पाणी येते सामाजिक उपक्रमासाठी कंपनीने पाणी दिले पाहिजे जो करारनामा केला त्यात जे जे मुद्दे सदस्यांनी मांडले त्याप्रमाणे नागरीकांच्या हितासाठी करारनाम्यात दुरूस्त्या कराव्यात.

श्रीमती प्रिती तोतला :समांतर एजन्सीकडे योजना हॅडवर्क केल्यापासून महापालिकेच्या मुख्य कार्यालयासाठी सुध्दा विकत पाणी घ्यावे लागते महापालिकेचे दवाखाने, शाळा अशा ठिकाणी मोफत पाणी कंपनीकडून मिळावे तसेच समांतर एजन्सीला दरमहा ५.२५ कोटी रक्कम दिली जाते एजन्सीने विकास कामासाठी आतापर्यत किती गुंतवणुक केली याचा विचार होत नाही.

सौ.साधना सुरडकर :महापालिका व्यावसायिक संस्था नाही तोटा सहन करून नागरीकांना पाणी देत होतो.कंपनीकडे पाणी योजना दिल्यापासून महापालिकेच्या इमारतीमधे स्वच्छतागृहात पाणी नाही. लाईट नसते,लाईन फुटते अशा विविध अडचणीमूळे पाणी येणार नसेल तर टँकरद्वारे पाणी पुरवावे सार्वजनिक उपक्रमासाठी पाणी मिळावे. २५ डिसेंबर रोजी १ टँकर घेणेसाठी कंपनीच्या अधिका-यांना बोलवावे लागले महापालिकेला स्वत:साठी पाणी नाही कंपनीच्या फायदयासाठी करारनामा केला महापालिकेने नागरीकांचे हित बघीतले नाही या सर्व दुरूस्त्या करारनाम्यात कराव्यात.तसेच अनेक भागात नागरीकांनी बेटरमेंन्ट चार्जेस भरणा केले तेथे लाईन टाकून देणार आश्वासन दिले

तीन वर्ष  झाले पाण्याच्या लाईनचे काम नाही हे योग्य नसून अशा ठिकाणी तातडीने कंपनीला काम करण्याचे आदेशीत करावे.

श्री.नासेर खान :वार्डात पाणी आले नव्हते. धार्मिक स्थळांसाठी नगरसेवकांनी बोलले तरी पाणी मिळत नाही. पैसे भरून घेतले. दरमहा ५.२५ कोटी प्रमाणे आतापर्यत किती रक्कम कंपनीला दिली.

श्री.मीर हिदायत अली :सकाळपासून कंपनीच्या कर्मचा-यांचे फोन बंद आहे. फोन उचलत नाही तसेच सकाळपासून लॉक लावून गेले. १७ वर्षात किती पाणीपट्टी होणार आहे व कंपनीला किती रक्कम मिळणार आहे.

श्री.कृष्णा बनकर :नवीन कनेक्शनसाठी ४१००/-रू घेतले पुन्हा ६ हजार रक्कम भरावी असे सांगण्यात येते हे योग्य आहे का ?

शहर अभियंता :पाणीपुरवठयाच्या संदर्भात ज्याही तक्रारी असतील त्या साठी समन्वयक म्हणून श्री.कोल्हे कार्य.अभियंता यांची नियुक्ती केली. तक्रार आल्यानंतर ताबडतोब लक्ष दिले जाईल.टँकर सिस्टीम जेथे चालू होती तेथे नियमीत पाणी देण्याचे लेखी कंपनीकडून घेतले आहे टँकर देण्यासाठी समन्वयक म्हणून अधिकारी नेमले जातील पाणीपुरवठयासाठी टीम नेमणार आहे वेळोवेळी येणारे दुरध्वनी घेतले जातील.

श्री.त्रिंबक तुपे :नवीन कनेक्शनसाठी किती रक्कम घेतली पाहिजे.

शहर अभियंता :कंपनी जास्त चार्ज आकारत असेल तर चौकशी करू.नवीन कनेक्शनसाठी एक वर्षाची पाणीपट्टी व बोरींग चार्जेस ई.नवीन कनेक्शनसाठी रक्कम घेतली पाहिजे चुकीने कंपनी वाढीव रक्कम घेत असेल तर ती रक्कम परत करण्याच्या सुचना कंपनीला दिल्या जातील.

मा.उपमहापौर :एक वर्षाची पाणीपट्टी व बोरींग चार्जेस असे मिळून ३५०० मध्ये नळ कनेक्शन मिळत होते. त्या प्रमाणे रक्कम घेण्याचे कंपनीला आजच्या आज आदेशीत करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :४X४ चा खड्डा लिकेज काढण्यासाठी केला. तो तसाच पडला आहे. एक महिन्यापासून सांगितले, आपले ही लोक पाहत नाही.

शहर अभियंता :वाढीव रक्कम आकारत असेल तर समजावून सांगितले जाईल.

श्री.मीर हिदायत अली :जे ८०० रू मध्ये मीटर येते ते ५ हजार चार्जेस लावणार असेल तर योग्य नाही.

शहर अभियंता :१०००-१२०० रू मार्केट मध्ये कॉस्ट आहे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :१रू चे काम कंपनीने केले नाही असे असतांना १८०० चे ३०५० पाणीपट्टी करणे योग्य नाही.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.राजू शिंदे :३०५०रू पाणीपट्टी घेणार असेल तर दररोज पाणी दयावे.

श्री.मिलींद दाभाडे :पाणीपट्टी वाढणार असेल तर दररोज पाणी मिळावे.नसता १८००रू ठेवावे.

श्री.प्रमोद राठोड :दोन दिवसाआड पाणी देणार असेल तर १८०० रू पाणीपट्टी ,दररोज पाणी देणार असेल तर ३०५० रू ठेवावे हे मान्य नसेल तर आमचा यास विरोध आहे.

श्री.किशोर नागरे :जास्तीत जास्त पाणी देण्याचा प्रयत्न करावा.

शहर अभियंता :दोन दिवसा आड ऐवजी एक दिवसाआड त्यानंतर त्यानंतर दररोज पाणी देणार यासाठी काही कामे करावी लागणार आहे.

मा.उपमहापौर :जायकवाडी येणारे पाणीच वाढले नाही तर दररोज पाणी कसे देणार आहे. पहील्या टप्प्यात जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंत लाईनचे काम एक आठवडयाच्या आत सुरू करावे.

शहर अभियंता :पाणीपट्टी दर हे पाणी वितरण करण्याच्या खर्चावर आधारीत असते.

या वेळी डायस समोर अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलत असतात.

श्री.प्रमोद राठोड :प्रशासनाने कंपनीला पाठीशी घालू नये.कंपनी चांगले काम करीत नाही.पैसे घेवून कंपनी नागरीकांना लुबाडत आहे.कंपनी काम करीत नाही पाणी देत नाही दोन दिवसा आड पाणी येते १८००रू ठेवावे नसता दररोज पाणी देणार असेल तर ३०५०रू करावे हरकत नाही.

श्री.राजू शिंदे :३०५०रू घेणार असेल तर दररोज पाणी दयावे नसता १८००रू घ्यावे ४५ मीनीटे ऐवजी आता ३० मिनिटेच पाणी दिले जाते.एजन्सीचे कर्मचारी महापालिकेचे आदेश पाळत नाही.

श्री.किशोर नागरे :जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यत लाईन टाकण्याचे काम सुरू करावे त्यानंतर शहरात पाणी वाटपाचे काम लाईनमन चांगल्या पध्दतीने करू शकतात.

मा.उपमहापौर :जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यत लाईन टाकण्याचे काम केंव्हा सुरू करणार आहे.

श्री.जगदीश सिध्द :समांतर एजन्सी पाणीपट्टी वसुल करीत आहे. जनतेला दररोज पाणी मिळावे. करारनाम्यात दुरूस्ती करावी.

शहर अभियंता :कॅपीटल एक्स्पीडेंचरची कामे सुरू करण्यासाठी प्राधान्य देणार आहोत तसेच जायकवाडी ते शहरापर्यत मुख्य लाईन टाकण्यास सर्वोच्च प्राधान्य देणार. नियोजन करण्याचे सुचना दिलेल्या आहेत. १५-२० दिवसात कोणत्याही परिस्थीती काम सुरू करण्यात येईल. शहरातील लाईन टाकण्याचे व टाक्या बांधण्याचे काम महत्वाचे आहे.एका भागात पाणी सोडायचे झाल्यास १०-१५ टप्पे येतात ऑनलाईन पुरवठा आहे त्यासाठी टाक्या सुध्दा बांधणे आवश्यक आहे. हायड्रोलिक मॉडेल तयार आहे डीपीआर मंजूर झाला.कंपनीची रक्कम किती महापालिकेची किती यानुसार या गोष्टी विचारात घेवून काम सुरू होईल. जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंतचे काम प्राधान्याने लवकरच सुरू होईल.

श्री.समीर राजूरकर : २७ डी (एफ)मध्ये इलेक्ट्रीसिटी बील कसे ट्रान्सफर करून देणार तारीख कोणती ग्राहय धरणार आहे

| | |
|---|---|
| शहर अभियंता | : इलेक्ट्रीसिटी बील ट्रॉन्सफर म्हणजे याचे बील ते भरणार,कंपनी कडे जेंव्हा ही योजना हस्तातरीत झाली ती तारीख ग्राहय धरणार (इंग्रजी वाचून दाखवतात )याचा अर्थ असा की ज्या दिवशी कन्सेशन ॲग्रीमेंन्ट केले त्या दिवशी रॉ मटेरियलाचे सुध्दा रेट ठरविले की १५ टक्के ग्राहय धरले यात १० टक्के आहे.दरवर्षी इलेक्ट्रीसिटीमध्ये १० टक्केनी वाढ होईल यापेक्षा जास्तीची वाढ झाली ती कंपनीवर टाकू नये असे म्हणणे होते. लाईट बील त्यांचे नावाचे असेल १० टक्के प्रमाणे कंपनीच भरणार आहे. |
| श्री.समीर राजूरकर | :ॲसेट ट्रांसफर केले. २७ डी-इलेक्ट्रिसीटी बील कसे ट्रांसफर करणार? आपण ॲसेट ट्रान्सफर करतो त्यामूळे बेसरेट पण ट्रान्सफर केले पाहिजे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :मीटरचा खर्च कोण करणार आहे तसेच १८००रू पाणीपट्टी ठेवणार काय याचा खुलासा करावा. |
| श्री.राजू शिंदे | : दोन दिवसा आड येणारे पाणी ४५ मिनिटे द्यावे व १८००रू घ्यावे. २९६ कर्मचारी महापालिकेकडे होते तेंव्हा दोन दिवसा आड पाणी आता कंपनीकडे ८०० कर्मचारी असतांना ४ दिवसाआड पाणी येते कंपनीकडे किती कर्मचारी आहे. |
| शहर अभियंता | :कर्मचारी संख्या वाढली तर पाणी वाढते असे नाही. पाणी देण्याची सिस्टम काय ,पाणी किती येते यावर वितरण अवलंबून असते.२९६ कर्मचारी मनपाने दिले कंपनीचे ५७१ कर्मचारी आहे. |
| श्री.राजू शिंदे | :याचा अर्थ कंपनीने हे कर्मचारी वसुलीसाठी घेतले.पाणी देणार नाही उलट नागरीकांकडून वसुलीची सक्ती करणार हे बरोबर नाही. |
| शहर अभियंता | :तक्रार निवारण यंत्रणा चांगली केली जाईल. |
| श्री.राजू शिंदे | :रॅमके, एएमटी या प्रमाणे या योजनेचे होवू नये कुणावर तरी जबाबदारी द्यावी आताच सदस्यांनी म्हटले की अधिकारी फोन घेत नाही.अधिकारी जबाबदारी घ्यायला तयार नाही.कंपनीचे कर्मचारी अधिका-यांचे फोन घेत नाही अशी परीस्थिती आहे. |
| श्री.प्रमोद राठोड | :एक कार्य.अभियंता सर्व ठिकाणचे प्रश्न सोडवू शकत नाही. वार्ड अभियंता यांचेकडे काम द्यावे.खालचे अधिकारी वरिष्ठ अधिका-याकडे बोट दाखवितात. |
| शहर अभियंता | :अगोदरची सिस्टम होती तशीच ठेवणार आहे.कंपनीशी संबध नाही असा गैरसमज कर्मचा-यात झाला असेल,मध्यंतरी कर्मचा-याचे पगार थांबवले होते. समजावून सांगितले संयुक्त रित्या काम करायचे सुचना दिल्या गैरसमज दूर झाले. काम सुरळीत होईल. |
| श्री.मिलींद दाभाडे | :संमातर शहराला भविष्यात २५-३० वर्षासाठी लाभदायी ठरणार शहरातील गोरगरीब जनता आहे हा केंद्र बिंदु मानुन या योजनेचे जनतेच्या हिताचे काही निकष ठरवायला पाहिजे होते. |
| मा.महापौर | :आपण मुद्यावर बोलावे इतर आरोप करणे योग्य नाही. |

या वेळी डायस समोर अनेक स.सदस्य मोठयाने बोलत असतात.

मा.महापौर :ज्यांना गोंधळ घालायचा त्यांनी बाहेर जावे.

मा.उपमहापौर :स.सदस्य जे बोलले इतिवृत्तांतून वगळावे.

मा.महापौर :हे शब्द कामकाजातून वगळण्यात येते. स.सदस्य यांना सभागृहाच्या बाहेर काढण्यात यावे.महत्वाच्या विषयावर चर्चा होत आहे स.सदस्य मिलींद दाभाडे यांनी त्यांचे शब्द परत घ्यावे हे शब्द कामकाजातून वगळावे.

श्री.मिलींद दाभाडे :गोरगरीब जनता यांना केंद्रबिंद समजून समांतर एजन्सीचा करारनामा करायला पाहिजे होता यात कंपनीचे हित जोपासले गेले.

श्री.प्रमोद राठोड :१८००रू पाणीपट्टी असावी दररोज पाणी देणार असेल तर ३०५० करावे.

या वेळी डायस समोर स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :स.सदस्य श्री.मिलींद दाभाडे यांनी त्यांचे शब्द परत घ्यावे.

श्री.राजू शिंदे :स.सदस्यांनी कुणाचेही नाव घेतले नाही त्यांचे शब्द इतिवृत्तातून वगळावे.

मा.महापौर :दोन दिवसापासून बैठक चालू आहे लोकप्रतिनिधी हे या शहराचेच आहे त्यांचा अपमान करणे योग्य नाही.

श्री.समीर राजूरकर :रू ३०५० ऐवजी १८००रू पाणीपट्टी करणे शक्य आहे का? खुलासा घ्यावा.

मा.महापौर :ज्यांना गोंधळ करायचा असेल त्यांनी सभागृहाच्या बाहेर जावे

श्री.राजू शिंदे :१८००रू पाणीपट्टी करावी शब्द मागे घ्यायला लावतो.

या वेळी डायस समोर मोठमोठयाने स.सदस्याचे बोलणे चालू असते.

मा.महापौर :पाण्याचा विषय महत्वाचा आहे सर्वांनी समजून घ्यावे. असा गोंधळ करायचा असेल तर त्यांनी सभागृहाच्या बाहेर जावे.दोन दिवसापासून या विषयावर चर्चा करतो सर्वांनी जागेवर बसावे.जनतेला पाणी मिळावे. सर्वांना जनता बघते. पाणी मिळाले पाहिजे सर्वांच्या भावना लक्षात घेवून समांतर जलवाहिनी या विषया संबधी बैठक आयोजित केली चर्चा होऊन प्रशासनाकडून योग्य खुलासा मिळावा व जनतेला दररोज पाणी मिळावे या विचाराने दोन दिवसापासून चर्चा करीत आहोत.एक विषय चालू असतांना दुसरा विषय घेवून सभागृहात गोंधळ घालणार असेल तर असे सदस्य सभागृहात न आलेले बरे, असे वाटते. आता फक्त पाणी या विषयावर बोलावे वैयक्तिक आरोप कुणावर करू नये चर्चा करून जनतेच्या हिताचे दृष्टीने करारनाम्यात काही दुरूस्ती करावयाची आहे.प्रशासन आता खुलासा करील.

सौ.प्रिती तोतला :कंपनीला योजना हँडवर्क करून चार महिणे झाले कंपनीने किती रक्कमेची विकास कामावर गुंतवणूक केली तसेच नवीन नळ कनेक्शनसाठी जास्तीचे रक्कम कंपनी घेत आहे.किती पैसे भरावे लागतील पेपरच्या माध्यमातून जनतेला कळवावे.

शहर अभियंता :गेल्या तीन वर्षापासून कंपनी या योजनेच्या प्रोसेस मधे आहे. या प्रोजेक्टचे डिझाईन, अंदाजपत्रक, आस्थापना मॅनेजमेंन्ट कार्यान्वित करणे चालू आहे.मध्यतंरी पंपहाऊसचे काम केले.अंदाजित ५०-७५ कोटीची गुंतवणुक एजन्सीची या योजनेच्या कामासाठी झाली असावी.पाणीपट्टी दर वाढी संदर्भात ७ सप्टेंबर २०११ रोजी प्रस्ताव मंजूर केला तसेच ठराव क्रमांक ४४१ अन्वये वाटर बायलॉजला मंजूरी दिली जनतेच्या सुचना हरकतीसाठी वर्तमान पत्रातून सर्व भाषेतून इलेक्ट्रानिक मिडीया तसेच वार्ड कार्यालयामध्ये नोटीफिकेशन लावले जनतेला आवाहन केले एकही हरकत सुचना आली नाही याचा अर्थ जनतेला हे मान्य होते.त्यानुसार एप्रिल २०१२ पासून याची अमलबजावणी सुरू केली.आता पाणीपट्टी दर हे खर्चावर अधारीत असतात आता कमी करता येणार नाही जो पैसा पाणीपट्टीतून येणार त्यावर हा प्रोजेक्ट उभा राहणार पाणीपट्टी आता कमी करणे योग्य होणार नाही.

श्री.राजू शिंदे :एक दिवसा आड पाणी देत होतो.आता दोन दिवसा आड पाणी येते.

शहर अभियंता :एक दिवसा आड दोन दिवसा आड किंवा दररोज पाणी देणे याचा पाणीपट्टी दराशी संबध नाही.खर्चाच्या अधारीत दर ठरविले जाते पाणीपट्टी कमी केली तर प्रोजेक्ट पुर्ण होण्यास अडचणी येतील सभागृह सर्वोच्च आहे जो निर्णय घ्यायचा तो घ्यावा.

मा.महापौर :कमेटी करणार आहोत त्यामध्ये हा विषय घेवू.

श्री.समीर राजूरकर :कंपनीला काम करायचे नसेल तर तसा प्रशासनाने प्रस्ताव ठेवावा.

शहर अभियंता :सुरूवातीचे तीन वर्ष पाणीपट्टी ही १८००रू असणार आहे त्यापुढे रू १८०० वर २५ टक्के वाढ होणार,वाढीव पाणीपट्टी मिळेल ती महापालिकेला मिळणार हे करारनाम्यात आहे.

मा.महापौर :रू १२०० वाढीव हे महापालिकेला मिळणार आहे दररोज पाणी देण्याचा निर्णय घेवू .

शहर अभियंता :पाणीपट्टी कमी केली तर प्रोजेक्टवर परिणाम होईल याचा बजेटवर बोजा येईल यात लॉस होणार निधी कमी पडणार अशा वेळी इतर बजेटमधून रक्कम घ्यावी लागेल.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :पाणी देणार नाही पैसे वाढून घेणार हे योग्य नाही.दररोज पाणी दयावे.

सौ.साधना सुरडकर : प्रत्येक व्यक्तीला एका दिवशी १३५ लि.पाणी देतो का ? पाण्याचे दर वाढविण्याचा विचार होतो.वाढीव पाणी देण्याचा विचार केला जात नाही.

शहर अभियंता :महिन्यातून १० दिवस पाणी येत असेल आणि मीटर लावल्यानंतर १० दिवसाचे बील ३०००रू येणार नाही १०००-१२०० रू येतील.

मा.महापौर :पिठासीन अधिकारी म्हणून मा.उपमहापौर हे काम पाहतील

या वेळी पिठासीन अधिकारी म्हणून मा.उपमहापौर हे मा.महापौराच्या आसनावर आसनग्रहन करतात. (वेळ दु.३-५०)

मा.उपमहापौर(पीठासीन अधि) :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे शांतता ठेवावी योग्य निर्णय घेतला जाईल. करारनाम्यात बदल करण्याचा अधिकार सभागृहाला आहे.त्यासाठी मा.महापौर यांनी कमेटी स्थापन केली त्यात पाणीपट्टी संदर्भात,टँकर चा विषय असेल ,नागरीकांच्या हिताच्या दृष्टीने जे करता येईल त्याचे एकत्रिकरण करून प्रशासनाला बदल करण्याचे सुचित करू व त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता घेवू. सर्वसाधारण सभेने करारनामा मंजूर केला दुरूस्तीचे अधिकार सभेला आहे कमेटीत १० लोक असतील त्यांनी आठ दिवसात निर्णय घेतील.

श्री.मीर हिदायत अली :१७ वर्षात पाणीपट्टी किती होणार आहे.

मा.उपमहापौर(पीठासीन अधि) :प्रशासनाने खुलासा केलेला आहे पैठण ते नक्षत्रवाडी पर्यत पाईप लाईन टाकण्यासाठी कमेटीकडून कालमर्यादा दिली जाईल १५ दिवसाच्या आत या लाईनचे काम सुरू झाले पाहिजे असे आदेशीत करू.

सौ.साधना सुरडकर :मीटर बसविल्यानंतर मीटर टॅक्स लागणार का, पाणीपट्टी भरण्याची गरज पडणार आहे का ?

मा.उपमहापौर :८००-९०० रू. मध्ये मीटर येत असेल व त्याचे ४०००/-रू कंपनी लावणार काय हे सर्व विषय कमेटीमध्ये चर्चेला घेतले जातील.

या वेळी पिठासीन अधिकारी म्हणून मा.महापौर आसनग्रहन करतात.(वेळ अंदाजे ४.००वा)

शहर अभियंता :मीटर बसवले तर जी रिडींग येईल त्याप्रमाणे पाण्याचे बील भरावे लागेल.

सौ.साधना सुरडकर :मीटरचे दर पुस्तकात नमुद आहे ८/- रू पर कि.मीटर दुसरा मजला प्लॅट साठी १५रू कि.मी. केले ते १०/-रू करण्यात यावे.हे दर वाढलेले आहे सर्वसामान्यांना तोलणारे नाही यावर विचार व्हावा.

शहर अभिंयता :दर निश्चित केले आज कमी करता येणार नाही मीटरचा सर्वांनाच फायदा आहे एखादा घर मालक ६ महिने घरी नसतील तर त्यांना ०० बील येणार.

मा.उपमहापौर :या विषयावर दोन दिवस सविस्तर चर्चा झाली.५-६ मुद्दे महत्वाचे आहे सर्व आढावा घेतला योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.राजू शिंदे :एमआयडीसी भागात नळाचे मीटर स्वत: कंपनी आणेल टेक्नीकल रिपोर्ट घ्यावा व ते मीटर सुरू करावे.कंपनीकडूनच घ्यावे असे बंदनकारक नसावे.

मा.महापौर :कमेटी गठीत करणार आहोत. ज्या सुचना केल्या त्यानुसार विचारविनिमय करुन निर्णय घेवू.

श्री.जगदीश सिध्द :करारनाम्यातील १ ते ३८ मुद्यांवर विचार करुन त्यातही दुरुस्ती करण्यात यावी.

श्री.प्रफुल्ल मालाणी :१ ते ३८ मध्ये जी दुरुस्ती करायची ते स.सदस्यांनी लेखी मा.महापौराकडे दयावे.

मा.महापौर :या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन, सर्वानुमते असा निर्णय घेण्यात येतो की तूर्त पाणीपट्टीची वसूली महानगरपालिकेने करावी. स.नगरसेवकांच्या वॉर्डात पाणी वितरणासाठी जलवाहिन्या टाकण्याची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत. तसेच शहरामध्ये विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास अथवा काही तांत्रिक बिघाडामुळे ज्या ज्या ठिकाणी नळाद्वारे पाणीपुरवठा शक्य होणार नाही. अशा सर्व ठिकाणी टँकरद्वारे मोफत पाणी पुरवठ्याचे नियोजन कंपनीतर्फे करण्यात यावे. महानगरपालिका कार्यालयातील इमारत टप्पा क्र. १ ते ३ ला नळाद्वारे पाणी पुरवठा न झाल्यास टँकरद्वारे मोफत पाणी पुरवठा करण्यात यावा. आज या इमारती पाणी नव्हते करारनाम्यात असेल तर ते वगळावे. पाणीपुरवठा कंपनीने करावा. ज्या भागात पाणी पुरवठा वरील तांत्रिक कारणांमुळे शक्य होणार नाही. अशा वेळी त्या भागातील सर्व स.सदस्यांना शक्य तितक्या आधी अवगत करावे. समांतर प्रकल्पाचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी १० सदस्यांची सुकाणू समिती (Stearing Committee) नेमणुक करण्यात येते. या समितीमध्ये प्रामुख्याने पाच पदाधिकाऱ्यांचा तसेच पक्षांचे गटनेतेसह स.सदस्यांचा समावेश असेल. मनपा मालकीच्या ज्या ज्या ठिकाणी इमारती, कार्यालय,दवाखाना,शाळा असेल अशा ठिकाणी पाण्याची व्यवस्था करावी. ज्या ज्या वेळी सांस्कृतिक सार्वजनिक उपक्रमाकरीता नागरीकांनी किंवा स.सदस्यांनी पाणी पुरविण्याची मागणी केल्यास तेथे कंपनीने टँकरद्वारे तातडीने पाणी पुरवठा करावा. प्रकल्पास मंजुरी देतांना एजन्सीने डी.आय. पाईप वापरावे अशी मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने या संपुर्ण समांतर योजनेत डी.आय. पाईपचाच वापर करावा. रु.१८००/- वरून रु.३०५०/- पाणीपट्टी करण्यात आली. त्यानुसार कंपनीने दररोज पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न करावा. नसता जी कमिटी केली त्या कमिटीत या सर्व बाबींचा व करारनाम्यात ज्या ज्या त्रुटी आहे. त्यावर कमिटी अभ्यास करून अहवाल सर्वसाधारण सभेत ठेऊन त्यावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार तूर्त पाणीपट्टीची वसूली महानगरपालिकेने करावी. वॉर्डात पाणी वितरणासाठी जलवाहिन्या टाकण्याची कामे प्राधान्याने हाती घेऊन तसेच शहरामध्ये विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास अथवा काही तांत्रिक बिघाडामुळे ज्या ज्या ठिकाणी नळाद्वारे पाणीपुरवठा शक्य होणार नाही. अशा सर्व ठिकाणी टँकरद्वारे मोफत पाणी पुरवठ्याचे नियोजन कंपनीतर्फे करण्यात यावे व महानगरपालिका कार्यालयातील इमारत टप्पा क्र. १ ते ३ ला, तसेच मनपा मालकिच्या ज्या ज्या ठिकाणी इमारती, कार्यालय, दवाखाना, शाळा असेल अशा ठिकाणी पाण्याची व्यवस्था कंपनीने करावे आणि ज्या ज्या वेळी सांस्कृतिक,

सार्वजनिक उपक्रमाकरीता नागरीकांनी किंवा स.सदस्यांनी पाणी पुरविण्याची मागणी केल्यास तेथे कंपनीने टँकरद्वारे तातडीने मोफत पाणी पुरवठा करावा तसेच तांत्रिक कारणांमुळे पाणी देणे शक्य होणार नाही. अशा वेळी स.सदस्यांना शक्य तितक्या आधी कळविणे. समांतर प्रकल्पाचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी १० सदस्यांची सुकाणू समिती (Stearing Committee) नेमण्यात येते. या समितीमध्ये प्रामुख्याने पाच पदाधिकाऱ्याचा तसेच पक्षांचे गटनेतेसह स.सदस्यांचा समावेश असेल. मनपा मालकीच्या प्रकल्पास मंजुरी देतांना एजन्सीने डी.आय. पाईप वापरावे अशी मंजुरी असल्याने त्यानुषंगाने या संपुर्ण समांतर योजनेत डी.आय.पाईपचाच वापर करण्यास तसेच रु.१८००/- वरून रु.३०५०/- पाणीपट्टी करण्यात आली. त्यानुसार कंपनीने दररोज पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न करणे. कमिटीत या सर्व बाबींचा व करारनाम्यात ज्या ज्या त्रुटी आहे त्यावर कमिटी अभ्यास करून अहवाल सर्वसाधारण सभेत ठेऊन त्यावर योग्य तो निर्णय घेण्यास मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

| | |
|---|---|
| श्री.जगदीश सिंध्द | :करारनाम्यात दुरूस्ती करावी. |
| मा.महापौर | :करारनाम्यात ज्या त्रुट्या आहे त्या कमेटीच्या मार्फत शिफारस केल्यानंतर केल्या जातील. |

या बरोबर आजची सभा राष्ट्रगिताने संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

(महबुबखॉ पठाण)
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद